# वेध लातूर

**व्यवसाय प्रबोधन परिषद** | Contact : vedhlatur@gmail.com


प्रति,

मा. मुख्याध्यापक / प्राचार्य

____________________________

लातूर.

सप्रेम नमस्कार,

- ❖ सुप्रसिध्द मनोविकास तज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या कल्पनेतून आकारला आलेला 'वेध' हा उपक्रम गेल्या २१ वर्षापासून ठाणे येथे व औरंगाबाद, अहमदनगर, नाशिक व पुणे येथे आयोजित जात आहे.
- ❖ 'वेध' (VEDH) म्हणजेच 'व्होकेशनल एज्युकेशन डायरेक्शन ॲण्ड हार्मनी' हा १४ ते २० वयोगटातील मुलां-मुलींना, पालक, शिक्षकांना व्यवसाय प्रबोधन करणारा, 'लय व दिशा' देणारा उपक्रम आहे.
- ❖ दरवर्षीच्या वेध परिषदेसाठी एक **'विचार सुत्र'** निवडले जाते. या विचार सूत्राशी निगडीत विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान ठरलेल्या मान्यवरांना आमंत्रित करण्यात येते. डॉ. आनंद नाडकर्णी या मान्यवरांशी मनमोकळ्या गप्पांतून त्यांची जडणघडण आणि करिअर ग्राफ उपस्थितांसमोर मांडतात. या संवादातून विद्यार्थी, पालक व शिक्षकांना विविध करिअर्स, त्यांची निवड, ध्येय आणि ते गाठण्यासाठीचा मार्ग, जीवनविषयक दृष्टीकोन आणि त्यासाठीचे मनोबल याविषयी सहज प्रबोधन होते.
- ❖ महाराष्ट्रभर या कार्यक्रमाला मिळणारा वाढता प्रतिसाद व लातूर सारख्या शिक्षणपंढरीत अशा उपक्रमांची वाढती 'गरज' लक्षात घेऊन गेल्या ५ वर्षापासून आपण वेध परिषदेचे आयोजन करीत आहोत. **२०१२ साली 'लोकल ते ग्लोबल' २०१३ साली ध्यास उत्कर्षाचा, २०१४ साली कर्तृत्वाचे मोजमाप, २०१५ साली 'अपयशाचे फायदे' व २०१६ साली 'देणे निसर्गाचे'** या विचारसुत्रांवर आधारित वेध परिषदेला आपल्या शहरात मिळालेला प्रतिसाद अभूतपूर्व होता. दयानंद सभागृहातील आसनसंख्येच्या मर्यादेमुळे अंसख्य विद्यार्थी व पालकांना या परिषदेत सहभागी होता आले नाही.
- ❖ यावर्षीची वेध परिषद रविवार दि. २२ जानेवारी २०१७ रोजी दयानंद सभागृहात संपन्न होत आहे. **'ऑफ बीट (...रंग माझा वेगळा)** या विचारसूत्रावर आधारित या परिषदेत विविध क्षेत्रातील खरेखुरे रोल मॉडेल्स आपल्यासमोर येणार आहेत, डॉ. आनंद नाडकर्णी या सर्वांशी गप्पा मारणार आहेत.
- ❖ लातूरची शैक्षणिक प्रतिमा उज्ज्वल करण्यास आपल्या शिक्षण संस्थेचे निश्चित योगदान आहे. बदलत्या जगातील बदलते वास्तव समजून घेऊन आपल्या विद्यार्थ्यांनी उज्ज्वल भविष्य घडवावे. यासाठी आपण करीत असलेल्या प्रयत्नात 'वेध' हे एक परिणामकारक साधन ठरेल असा आम्हाला विश्वास वाटतो.
- ❖ यासाठी विनंती की, आपल्या संस्थेतील १४ ते २० या वयोगटातील विद्यार्थ्यांना या कार्यक्रमास विषयी अवगत करावे व त्यांच्या प्रवेशिका आरक्षित कराव्यात, म्हणजे ऐनवेळीची निराशा टाळता येईल. आवश्यकता भासल्यास या उपक्रमाविषयी विद्यार्थी/शिक्षकांशी संवाद करण्यास आम्ही संस्थेत येण्यास तयार आहोत.

सहकार्याच्या व प्रतिसादाच्या अपेक्षेसह.

आपला

**धनंजय कुलकर्णी**

(समन्वयक)


संपर्क : अनिल कुलकर्णी ९४२३०७७६०९, प्रा. उर्मिला धाराशिवे ९४२२४६९३४५, ध्रुवराज मुजूमदार ९४२१५८३९८६